**जगभर**

# असंयत, अदूरदर्शी अमेरिकन औद्धत्य

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

जगाला एव्हाना अमेरिकन अध्यक्ष ट्रम्पच्या लहरी धोरणांची सवय व्हायला हवी. अलिकडचा जगाला धोक्याकडे नेणारा इराणबाबतचा निर्णय हा नवीन धक्का. इराण अण्वस्त्रक्षम होऊ नये म्हणून युरोपियन युनिअन (त्यात ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी आले), चीन, रशिया व अमेरिकेने २०१५ साली इराणबरोबर एक करार केला होता. त्यानुसार इराणचा अण्वस्त्रप्रकल्प आंतरराष्ट्रीय तपासणीखाली आला. अण्वस्त्रे बनवायला लागणारी सामग्री इराण यापुढे तयार करणार नाही आणि आहे तिचा वापर करणार नाही. असे कराराचे थोडक्यात स्वरूप. त्या बदल्यात इराणवर तोपर्यंत असणारे व्यापारी निर्बंध उठवण्यात आले जेणेकरून इराण जागतिक व्यापाराच्या प्रवाहात येईल. या करारातून अमेरिका बाहेर पडत आहे असे ट्रम्पने ८ मे ला एकतर्फी जाहीर केले. अमेरिका-युरोपसंबंध, इराणचा अण्वस्त्र प्रकल्प, इराणचा मध्यपूर्वेतील प्रभाव आणि जगातील अण्वस्त्रक्षम देशांची संख्या वाढण्याची शक्यता असे अनेक पदर या निर्णयाला आहेत.

**अमेरिकन धोरणातील बदल**

प्रथम अमेरिकेच्या परराष्ट्रीय धोरणातील गेल्या काही वर्षातील परिवर्तन पाहू.

२००१ ला New York वरील हल्ल्यानंतर अमेरिकेने अल्-कईदाला नेस्तनाबूत करण्यासाठी अफगाणिस्तानची राजवट बदलली. कारण त्या राजवटीच्या आश्रयाने हल्ला अल्-कईदाने केला, असा संशय. त्याबरोबर अफगाणिस्तानची सकारात्मक पुनर्रचना करण्याचे उदात्त ध्येयही सांगण्यात आले. १७ वर्षानंतर ती कारवाई अजून संपलेली नाही आणि तो देश त्वरेने विनाशाकडे जात आहे.

२००३ला अमेरिकेने इराकवर आक्रमण केले. हे दुसरे इराक युद्ध. तेव्हा जॉर्ज बुश क्रमांक दोन हा अध्यक्ष होता त्यावेळी सांगायची कारणे - इराकी राजवट आणि अल्-कईदा यांचे संगनमत आहे, इराककडे अण्वस्त्र क्षमता आहे म्हणून तो देश जगाला धोका आहे, इत्यादी - हे खोटे होते हे नंतर उघडकीला आले, तो मुद्दा निराळा. खरा उद्देश सद्दाम हुसेनची राजवट उलथणे हा होता. त्यामागे (दुर्लक्षित) वैयक्तिक कारण होते. पहिल्या इराकी युद्धानंतरही (१९९१) हुसेनची राजवट शाबूत राहिली. तेव्हाचा अमेरिकेन अध्यक्ष जॉर्ज बुश क्रमांक एक. आपल्या वडिलांच्या अपमानाचा वचपा काढणे हे दुसऱ्या युद्धाचे वैयक्तिक कारण होते. तेव्हाही हुकूमशाहीतून इराक 'मुक्त' करणे हे ध्येय सांगण्यात आले. थोडक्यात, ही दोन्ही महागडी युद्धे राजवटी बदलण्यासाठी झाली, दुसरे, अध्यक्षाच्या वैयक्तिक आकसाने. नंतरच्या ओबामा राजवटीने अमेरिकेचा असा ससैन्य हस्तक्षेप थांबवला. राजवटी बदलणे हे ध्येय राहिले नाही. (सीरियात अमेरिकेने असा हस्तक्षेप केला असता तर यादवी आणि लाखो लोकांचे प्राण वाचले असते. तोही मुद्दा निराळा.)

**इराणचा विस्तारवाद**

या अमेरिकन पार्श्वभूमीनंतर इराण. त्या प्रश्नाला दोन प्रमुख पैलू आहेत. इराणची अण्वस्त्रक्षमता हा एक भाग झाला. दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे इराणचा विस्तारवाद.

मध्यपूर्वेत तीन बलिष्ठ राष्ट्रे - इराण, सौदी अरेबिया आणि इस्रायल. इराण शिया मुस्लीम तर सौदी सुन्नी मुस्लीम. इस्राएल ज्यू. तिघांचेही परस्परवैर. दोन युद्धे व सद्दामचा पाडाव यानंतर इराक दुबळा झाला. ती संधी हेरून इराणने तो देश आपल्या प्रभाव क्षेत्राखाली आणायला सुरुवात केली.

मग सीरिया. तेथील वर्तमान अराजकात हुकूमशहा असद पदच्युत होऊ नये म्हणून इराण सैन्य,शस्त्रे पुरवत आहे. असद सत्तेवर राहिलाच तर तो इराणच्या नियंत्रणाखाली राहणार हे एक, दुसरे म्हणजे बेचिराख सीरियाच्या युद्धोत्तर पुनर्रचनेसाठीची मोठी कंत्राटे इराणला हवी आहेत. तिसरा उद्देश सीरियात आरमारी तळ बसवणे व चौथा - तेथे लष्करी तळ बसवून इस्राएलविरुद्ध कारवाया करणे.

सीरियाशेजारच्या लेबनॉन देशातही इराणचा प्रभाव आहे. तेथे हेज्बोल्ला नावाचा एक पक्ष आहे. तो इराणच्या समर्थनावर मोठा झाला. हेज्बोल्लाचे 'स्वयंसेवक' मोठ्या प्रमाणावर असदच्या बाजूने सीरियात लढत आहेत. लेबनॉनमध्ये नऊ वर्षांनतर नुकत्याच सार्वत्रिक निवडणुका झाल्या. त्यात हेज्बोल्ला आघाडी बहुमताने निवडून आली. त्यामुळे, इराकसारखेच तेथेही इराणचे हितसंबंध राखणारे सरकार येईल.

याखेरीज येमेन. तेथे गेली अनेक वर्षे भिन्न जमातीत हिंसक संघर्ष आहे. त्यातील एक हूथी. ते प्रामुख्याने शिया. त्यांना इराणची सशस्त्र मदत आहे. दुसऱ्या बाजूला सौदी अरेबिया, जॉर्डन व मोरोक्कोची मदत आहे. त्यांना हूथींविरुद्ध अमेरिकेचा आधुनिक यंत्रणेचा पाठिंबा आहे.

ट्रम्पच्या सल्लागारांचे मत असे की मध्य-पूर्वेतील इराणचा प्रभाव कमी करण्याचा एकच खात्रीशीर मार्ग म्हणजे राजवट बदलणे. निर्बंध आणले की लोकमत सरकारविरुद्ध जाईल व राजवट बदलेल. २०१५ला इराणबरोबर करार केला तेव्हा सर्व देशांनी इराणचा विस्तारवाद हा मुद्दा बाजूला ठेवला. फक्त अण्वस्त्रक्षमतेवर लक्ष केंद्रित केले. म्हणजे इराणचे हस्तक्षेप अणुयुद्धापर्यंत जाऊ नयेत. ट्रम्पला ते मंजूर नाही. वस्तुत: तपासणीबाबत इराण आजवर आंतरराष्ट्रीय निरीक्षकांना सहकार्य देत आहे असा उर्वरित जगाचा निर्वाळा आहे. म्हणजे, ट्रम्पच्या भूमिकेचा अंतस्थ हेतू राजवट बदलणे हा असावा, किंवा वैयक्तिक आकस - ते पुढे पाहू. ट्रम्पने या करारातून अमेरिकेचा सहभाग काढू नये म्हणून फ्रान्स, जर्मनीचे अध्यक्ष आणि ब्रिटिश परराष्ट्रमंत्री मागील काही दिवसांत तातडीने अमेरिकेला रवाना झाले.ट्रम्पने कोणालाच दाद दिली नाही.

**युरोपची पंचाईत**

जागतिक शांततेसाठी जगातील अण्वस्त्रे कमी व्हावीत या उद्देशाबरोबर युरोपची भीती म्हणजे इराणवर व्यापारी निर्बंध परत चालू होतील.म्हणजे इराणशी व्यापारी, आर्थिक देवघेव अमेरिका बंद करेल. पण या निर्बंधांचा आवाका अमेरिकेपुरता मर्यादित नाही. जे कोणी देश, कंपन्या, बँका इराणशी व्यवहार करतील त्यांच्याशी अमेरिका सहा महिन्यांनंतर व्यवहार करणार नाही हा युरोपला अचानक मोठा धक्का आहे. मेख अशी की, युरोपचा अमेरिकेशी असलेला व्यवहार युरोपच्या इराणशी असणाऱ्या व्यवहाराच्या कित्येक पटीत आहे. तो धोक्यात येणे युरोपला परवडणारे नाही. मग त्यांनाही इराणवर बहिष्कार घालावा लागेल. आपल्या कारकीर्दीत ट्रम्पने युरोपबद्दलची तुच्छता अनेकदा स्पष्ट केलेली आहे.

निवडणूक प्रचारापासून NATO या अमेरिकन-युरोपिअन लष्करी संघटनेवर ट्रम्पने टीका केलेली आहे. या संघटनेचा जन्म दुसऱ्या महायुद्धानंतर झाला. त्याअन्वये यातील कोणत्याही सभासद देशावर परकीय हल्ला झाल्यास संघटना त्या देशाच्या संरक्षणाला बांधील आहे. याचा अर्थ वास्तवात, युरोपमधील २९ पैकी कोणत्याही देशावर हल्ला झाल्यास, अमेरिका त्याला संरक्षण देईल. अमेरिकेवर हल्ला झालाच तर युरोप इच्छा असली तरी अमेरिकेच्या मदतीला धावून जाऊ शकत नाही. कारण त्याकडे ती ताकद नाही. या संरक्षणाचा खर्च ज्या प्रमाणात युरोपमधील देशांनी उचलायला पाहिजे, त्या प्रमाणात ते उचलत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. म्हणजे युरोप अमेरिकेच्या खर्चाने खुशाल राहतो, हे ट्रम्पचे म्हणणे. त्यात तथ्य आहे पण युरोपकडे सरसकट दुर्लक्ष करणे हे त्याला उत्तर नाही. जर्मनीच्या अध्यक्षांनी 'यापुढे युरोप अमेरिकेवर संरक्षणासाठी अवलंबून राहू शकणार नाही' असे म्हटले. युरोपिअन युनिअनच्या परराष्ट्रमंत्र्याने अमेरिकेशिवाय इराण करार चालूच राहील असे म्हटले व इराणशी पुन्हा वाटाघाटी सुरू केल्या.

NATO हे एक उदाहरण झाले. त्याआधीही जागतिक पर्यावरण-संरक्षण गटातून अमेरिकेने बाहेर पडू नये म्हणूनही युरोपने ट्रम्पच्या विनवण्या केल्या होत्या. अमेरिका बाहेर गेलीच - हे दुसरे उदाहरण. आता ट्रम्प अमेरिका-युरोपमधील काही व्यापारावर युरोपला जाचक निर्बंध लादू इच्छितो. म्हणजे, आपापत: आलेले जागतिक नेतृत्व राबवण्यासाठी काही किमान संकेत पाळावेत ही जाणीवच या अध्यक्षाकडे नाही.

**इतर परिणाम**

यात अमेरिकेची विश्वासार्हता हा पहिला मुद्दा. इराणने करार पाळला, अमेरिकेने नाही. हे सार्वमत. मग उद्या अमेरिकेवर करारांसाठी कसा विश्वास ठेवणार?

मग इराणची पहिली प्रतिक्रिया - 'आता आम्ही आमचा अण्वस्त्र प्रकल्प पुढे नेणार'. इराण अण्वस्त्रक्षम झाला तर आम्हीही अण्वस्त्रक्षम होऊ असे सौदी अरेबियाने जाहीर केले आहे. इराणविरोधी ज्यू इस्राएल अण्वस्त्रक्षम आहेच. (फक्त इस्राएलने ट्रम्पच्या निर्णयाचे स्वागत केले आहे.) मध्यपूर्वेतील अण्वस्त्र स्पर्धा जगाला विनाशाकडे नेईल.

आधीच्या करारात ओबामाचा पुढाकार होता. त्याच्याविरुद्धचा ट्रम्पचा आकसही यामागे आहे.

म्हणजे हे वर्तुळ परत वैयक्तिक सूडापोटी इतर राजवटी बदलणे इथपर्यंत पोचते. आधी इराक मग इराण. आणि ते अमेरिकनांना मान्य आहे, त्यामुळे तर ट्रम्प टिकून आहे. यावरून लोकशाहीच्या विश्वासार्हतेवरही संदेह निर्माण होतो.

याचा जगासाठी आणखी एक दुष्परिणाम म्हणजे, एकाधिकारशाही सोकावतात. तुर्कस्तान व रशिया या हुकूमशाह्या आहेत. भले, आवरण लोकशाहीचे असो. त्यांच्या वाढत्या अंतर्गत दमनकारी धोरणांना प्रोत्साहन मिळते. त्या सीरियाच्या सत्ता-पोकळीत शिरल्याच आहेत; अमेरिकेने पोरक्या केलेल्या युरोपला व्यापारासाठी चीनकडे वळावे लागेल असे दिसते. ब्रिटनचे कॉमनवेल्थचे नवे प्रेमही या दृष्टीने पहायला हवे.

आजवर असे दिसून आले आहे की अशा निर्बंधानी हाल होतात ते सामान्य माणसाचे. वस्तूंची टंचाई वाढते, असंतोष दाबण्यासाठी राजवट अधिक दमनकारी होते. म्हणजे ट्रम्पच्या लहरीपणाची किंमत सामान्य इराणी देणार. त्याबरोबरच 'आम्ही म्हणतच होतो - अमेरिकेवर विश्वास ठेवू नका' अशा मताच्या उजव्या शक्ती इराणमध्ये अधिक बळकट होतील.

*wwww.art-non-deco.com*
*artnondeco@yahoo.co.uk*

श्री